MHPU240004242021

## <u>रे.मु.नं. ८४/२०२१ मधील निशाणी क्र. २२ वरील आदेश</u>

१. प्रस्तुत अर्ज वादीने प्रतिवादी क्र. १ दशरथ मारुती खेबडे हे मयत झाल्याने त्यांचे नाव दावे अर्जातून कमी/कंस करण्यासाठी जो विलंब झाला तो माफ होवून मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. त्यास प्रतिवादींतर्फे लेखी खुलासा मागविण्यात आला.

२. वादीच्या अर्जातील कथानानुसार, प्रतिवादी क्र. १ दशरथ मारुती खेबडे हे दिनांक २७.०४.२०२१ रोजी मयत झाले असुन त्यांचे वारस, वादी, प्रतिवादी क्र. २ व प्रतिवादी क्र. ४ हे असून याव्यतिरिक्त त्यांना इतर कोणीही वारस नाही. त्यामुळे प्रतिवादी क्र. १ दशरथ मारुती खेबडे यांचे नाव दाव्याचे सरनाम्यातून कमी करुन तशी दुरुस्ती करणे आवश्यक आहे. परंतु कोरोना महामारीमुळे न्यायालय बंद असल्याने वादीस सदरची दुरुस्ती मुदतीत करता आली नाही. सदरची दुरुस्ती ही तांत्रिक स्वरुपाची असून अर्ज मंजुर झाल्यास प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. उलटपक्षी अर्ज नामंजुर झाल्यास वादीचे कधीही भरुन न येणारे असे आर्थिक नुकसान होणार आहे. त्यामुळे वादीस सदर प्रतिवादीचे नाव दाव्याचे सरनाम्यातून कमी करण्यास झालेला विलंब माफ होवून अर्ज मंजुर करण्यात यावा अशी विनंती केली.

३. प्रस्तुतच्या अर्जावर प्रतिवादी क्र. २ ते ४ यांनी त्यांचे म्हणणे दाखल करून झालेल्या विलंबाबाबत जास्तीत जास्त कॉस्ट करुन वादीचा अर्ज मंजुर करावा अशी विनंती केलेली आहे.

४. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखावरील दस्तऐवजांचे अवलोकन केले असता, वादीने प्रस्तुत दावा हा जाहिर ठराव व निरंतरचा मनाई हुकूम होवून मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. परंतु दाव्याचे कामकाज प्रलंबित असतांना प्रतिवादी क्र. १ दशरथ मारुती खेबडे हे दि. २७.०४.२०२१ रोजी मयत झाल्याचे दिसून येते. परंतु वादीने प्रस्तुत अर्ज हा दि. २२.०६.२०२२ रोजी दाखल केल्याचा

दिसतो. अशा परिस्थितीत वादींनी प्रस्तुतचा दिलेला अर्ज व त्याबाबत कायदेशीर बाब पाहता, दिवाणी प्रक्रिया संहिताचे आदेश २२ नियम ०४ प्रमाणे मयत प्रतिवादीचे वारस सदर व्यक्ती मयत झाल्यापासून ९० दिवसांचे आत अर्ज सादर करुन अभिलेखावर घेणे आवश्यक असते. जरी प्रतिवादी क्र. १ चे वारस यापुर्वीच अभिलेखावर सामील असले तरी प्रतिवादी क्र. १ चे नाव दाव्याचे सरनाम्यातून कमी/कंस करुन तशी दुरुस्ती मुदतीत करणे आवश्यक होते. वादीने सदरचा अर्ज दि. २२.०६.२०२२ रोजी दाखल केलेला दिसतो. वादीला प्रस्तुत अर्ज दाखल करण्यास सुमारे ६ महिन्यांपेक्षा जास्त विलंब झाल्याचे दिसते. परंतु असे जरी असले तरी, वादीला कोरोना महामारीच्या निर्बंधामुळे मुदतीत अर्ज करता आला नाही असे वादीचे कथन आहे. परंतु वादीच्या अर्जातील कारण संयुक्तीक वाटत नाही. त्यामुळे अशा परिस्थितीत सदर अर्जात नमुद केलेली परिस्थिती व कायदेशीर बाब या सर्व बाबी सारासार न्यायबुध्दीने विचारात घेता, सदर अर्ज मंजुर केल्यास प्रतिवादींच्या न्याय हक्कावर कोणत्याही प्रकारे गदा येणार नाही. उलटपक्षी उभय पक्षकारांमधील खरा वाद अंतिमत: न्यायनिर्णीत करणे सोईचे होईल. तसेच प्रतिवादी यांनी देखील वादीच्या प्रस्तुत अर्जास स्पष्ट हरकत घेतल्याचे दिसून येत नाही. सबब, नैसर्गिक न्यायतत्वास अनुसरुन, वादीस प्रतिवादी क्र. १ दशरथ मारुती खेबडे यांचे नाव दाव्याचे सरनाम्यातून कमी करण्यास झालेल्या विलंबाबाबत खर्च आकारून अर्ज मंजुर करणे आवश्यक असलेच्या निष्कर्षाप्रत येवुन, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. वादीचा प्रस्तुत अर्ज निशाणी क्र. २२ हा प्रतिवादी क्र. २ ते ४ यांना एकत्रित रक्कम रूपये ५००/—(रुपये पाचशे मात्र) इतका खर्च देण्याचे अटीवर मंजुर करण्यात येत आहे.

२. सदर आदेश खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला.

(श्रीमती. एम. एस. माळी)

दि.१६.०८.२०२२ — २ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
घोडेगाव

MHPU240004242021

## रे.मु.नं. ८४/२०२१ मधील निशाणी क्र. २० वरील आदेश

१. प्रस्तुत अर्ज वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहितेचे आदेश ६ नियम १७ प्रमाणे प्रतिवादी क्र. १ दशरथ मारुती खेबडे हे मयत झाल्याने त्यांचे नाव दाव्याचे सरनाम्यातून कमी/कंस करुन त्याप्रमाणे दुरुस्ती दावे अर्जात करण्यासाठी दाखल केलेला आहे. त्यावर प्रतिवादींचे म्हणणे मागविण्यात आले.

२. वादीच्या अर्जातील कथनानुसार, प्रतिवादी क्र. १ दशरथ मारुती खेबडे हे दिनांक २७.०४.२०२१ रोजी मयत झाले असुन त्यांचे वारस, वादी, प्रतिवादी क्र. २ व प्रतिवादी क्र. ४ हे असून याव्यतिरिक्त त्यांना इतर कोणीही वारस नाही. त्यामुळे प्रतिवादी क्र. १ दशरथ मारुती खेबडे यांचे नाव दाव्याचे सरनाम्यातून कमी करुन तशी दुरुस्ती करणे आवश्यक आहे. परंतु कोरोना महामारीमुळे वादीस सदरची दुरुस्ती करता आली नाही. सदरची दुरुस्ती ही तांत्रिक स्वरुपाची असून अर्ज मंजुर झाल्यास प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. उलटपक्षी अर्ज नामंजुर झाल्यास वादीचे कधीही भरुन न येणारे असे आर्थिक नुकसान होणार आहे. त्यामुळे वादीस सदर प्रतिवादीचे नाव दाव्याचे सरनाम्यातून कमी करुन तशी दुरुस्ती करण्यास परवानगी मिळावी अशी विनंती केलेली आहे.

३. प्रतिवादी क्र. २ ते ४ तर्फे सदर अर्जास म्हणणे दाखल करुन वादीचा अर्ज मंजुर करण्यास हरकत नाही अशी विनंती केली आहे.

४. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखावरील दस्ताऐवजाचे अवलोकन केले असता, प्रस्तुत दावा हा जाहिर ठराव व निरंतरचा मनाई हुकूम होवून मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. परंतु दाव्याचे कामकाज प्रलंबीत असतांना प्रतिवादी क्र. १ दशरथ मारुती खेबडे हे दिनांक २७.०४.२०२१ रोजी

मयत झाल्याचे दिसून येतात व त्यांचे वारस हे दाव्याचे कामी वादी व प्रतिवादीपणात सामील असल्याचे वादीने कथन केलेले आहे. प्रस्तुत अर्जासोबत वादीने त्याचे कथनाचे सत्यतेकरीता स्वत:चे प्रतिज्ञापत्र नि. २१ प्रमाणे अभिलेखावर सादर केलेले आहे. तसेच सदरचे वादीचे कथनास प्रतिवादीतर्फे कोणतीही स्पष्ट हरकत नोंदविल्याचे दिसून येत नाही. सदर दुरुस्ती ही तांत्रिक स्वरुपाची आहे. सदरच्या दुरुस्तीचे स्वरुप पाहता, त्यामुळे वादीच्या दाव्याच्या स्वरुपात कोणताही बदल होणार नाही अथवा सदर दुरुस्तीमुळे प्रतिवादींच्या न्यायहक्कांवर कोणत्याही प्रकारे गदा येणार नाही. उलटपक्षी सदर अर्ज मंजुर केल्यास उभय पक्षकारांमधील खरा वाद अंतिमत: गुणवत्तेवर न्यायनिर्णित करणे सोयीचे होईल. सबब, मी नैसर्गिक न्याय तत्वास अनुसरुन खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. वादीचा प्रस्तुत अर्ज निशाणी क्र. २० हा मंजुर करण्यात येत आहे.

२. वादीला असाही आदेश देण्यात येतो की, त्यांनी प्रस्तुत अर्जाप्रमाणे दाव्याचे सरनाम्यात १४ दिवसाचे आत अथवा पुढील तारखेपर्यत दुरुस्ती करावी.

(श्रीमती. एम. एस. माळी)
दि.१६.०८.२०२२ २ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
घोडेगाव